आपली सेवा आमचे कर्तव्य

# राज्य सेवा हक्क आयोग

राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,
७ वा मजला, नविन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल :-ccrts@maharashtra.gov.in
दुरध्वनी :-०२२- २२८३२३४६,

---

क्र. बैठक - २०२३ /प्र.क्र.१०९/मुसेहआ/कक्ष-२

दिनांक : - ११ ऑगस्ट, २०२३

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रचार व प्रसिध्दीबाबत**

राज्यातील नागरीकांना राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने देण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला असून सदर अधिनियम दि.२८.०४.२०१५ पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्याबाबत संक्षिप्त माहिती शासनाच्या सर्व विभागांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे उपयोगी ठरेल, असे आयोगाचे मत आहे. त्याअनुषंगाने मराठी व इंग्रजी माहितीपत्रे सोबत जोडली आहेत. कृपया सदर माहितीपत्रे आपल्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावीत. तसेच आपल्या जिल्हयातील इतर प्रमुख कार्यालयांच्या संकेतस्थळावर ही सदर माहितीपत्रे प्रसिद्ध करण्याबाबत कृपया संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

(मनु कुमार श्रीवास्तव) ११/०८/२०२३
राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त

प्रत :- सर्व विभागीय आयुक्त.

सहकार आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले,

महाराष्ट्र शासन

आपली सेवा - आमचे कर्तव्य
**महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग**

अ.शा.क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.१४५/ रासेहआपु/ कार्या-१ / ३९०
दिनांक : ०५/०९/२०२३

विषय :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रचार व प्रसिध्दीबाबत...

संदर्भ :- मा. मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. बैठक-२०२३/ प्र.क्र.१०९/ मुसेहआ/कक्ष-२, दि.११/०८/२०२३.

प्रिय श्री जितेंद्रजी,

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रचार व प्रसिध्दीसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्याबाबत संक्षिप्त माहितीची मराठी व इंग्रजी माहितीपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच जिल्हयातील इतर प्रमुख कार्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना मा. मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रचार व प्रसिध्दीसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्याबाबत संक्षिप्त माहितीची मराठी व इंग्रजी माहितीपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी तसेच सदर माहितीपत्रे आपल्या जिल्हयातील इतर प्रमुख कार्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

आपला स्नेहांकित,

(दिलीप शिंदे)

सहपत्र :- वरीलप्रमाणे

श्री. जितेंद्र डुडी (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, सातारा

प्रत- विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर-घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११ ००४
दूरध्वनी क्र. (०२०) २९९५०६६३ ई-मेल :- crtspune@maharashtra.gov.in

आपली सेवा आमचे कर्तव्य

## जिल्हयाच्या संकेतस्थळावरील मुखपृष्ठासाठी मजकुर

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला असून तो दि.२८.४.२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे.

वरीलप्रमाणे अधिसूचित सेवा नागरिकांना दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व या संदर्भात सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथे असून सहा विभागातील मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत.

पात्र नागरीकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरुध्द संबंधितांना वरीष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते व तरीही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिकाऱ्यास प्रतिप्रकरण रु.५०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

*महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची वेबसाईट खालीलप्रमाणे आहे :-*
https://aaplesarkar.mahaonline.gov.in



Scanned with OKEN Scanner

Your Service is our Duty

## Matter for Homepage of District Website

The Maharashtra Right to Public Services Act, 2015 is enacted and is in force since 28.04.2015 to ensure that notified services are provided to the citizens in a transparent, speedy and time-bound manner by various Government Departments and Public Authorities under the Government. Its objective is to provide easy, prompt and time bound services to the citizens.

The Maharashtra State Commission for Right to Public Service has been constituted under the above Act to monitor, coordinate, control and improve the public services being provided by the Government. The Commission consists of a Chief Commissioner and six Commissioners. The headquarter of the Commission is at New Administrative Building, opposite Mantralaya, Mumbai and the Divisional Offices of the Commissioners are at the six Divisional Headquarters.

If any notified service is not provided to any eligible person within stipulated time or is rejected without proper grounds, the concerned person may file 1st and 2nd appeals with the higher authorities and if he is not satisfied with their decision, he may prefer third appeal to the Commission. The erring officer is liable for a penalty up to Rs. 5000/- per case.

*Website of the Maharashtra State Commission for Right to Service is : - https://aaplesarkar.mahaonline.gov.in*



Scanned with OKEN Scanner